MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -४९ | मंगळवार दि.०५ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -49 | TUESDAY DT.05 NOVEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



## निवडणुक निरीक्षक एस . मल्लिका यांची नेकनुर हद्दीतील रत्नागिरी फाटा,चौसाळा तपासणी नाक्याला भेट

बीड : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकी दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येत असुन तपासणी नाक्यावर वाहनांची कसुन तपासणी आणि चौकशी करण्यात येत आहे. निवडणुक निरीक्षक एस.मल्लिका यांनी काल दि.४ सोमवार रोजी केज मतदार संघातील नेकनुर पोलिस स्टेशन हद्दीतील नेकनुर, रत्नागिरी फाटा,चौसाळा तपासणी नाक्याला भेट देऊन पाहणी केली.कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याबाबत आवश्यक सुचना दिल्या.यावेळी केज उपविभागीय पोलिस अधिकारी कमलेश मीना, नेकनुर पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी उपस्थित होते.एसएसटी पथका मार्फत दिवसा व रात्री वाहनांची तपासणी करण्यात करण्यात येत आहे.

# शरद पवार संसदीय राजकारण सोडणार?

## म्हणाले - किती निवडणुका लढवायच्या? कुठे तरी थांबले पाहिजे, नवी पिढी समोर आली पाहिजे

पुणे /प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी संसदीय राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिलेत. आतापर्यंत मी १४ निवडणुका लढल्या. आणखी किती लढवायच्या? कुठेतरी थांबले पाहिजे. नवी पिढी समोर यावी हे सूत्र हाती घेऊन मी आता कामाला लागलो आहे, असे ते बारामती येथे आयोजित एका प्रचारसभेत बोलताना म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे ते सक्रिय राजकारणातून संन्यास घेणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

शरद पवार सध्या आपले नातू तथा बारामती विधानसभा मतदारसंघातील उमेदवार युगेंद्र पवार यांच्यासाठी प्रचारसभा घेत आहेत. त्यांनी मंगळवारी एका प्रचारसभेला संबोधित करताना संसदीय राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिले. ते म्हणाले, मी सध्या सरकारमध्ये नाही. माझ्या राज्यसभेचे अजून दीड वर्षे शिल्लक आहेत. त्यानंतर पुन्हा राज्यसभेवर जायचे की नाही याचा मला विचार करावा लागेल. मी आता लोकसभाच नाही तर कोणतीही निवडणूक लढवणार नाही. किती निवडणुका लढवायच्या.

आतापर्यंत १४ निवडणुका लढल्या. तुम्ही एकदाही घरी पाठवले नाही.

नवी पिढी तयार करण्याची गरज

दरवेळी तुम्ही मला निवडून दिले. पण आता कुठेतरी थांबले पाहिजे. नवी पिढी समोर यावी हे सूत्र हाती घेऊन आता मी कामाला लागलो आहे. पण याचा अर्थ मी समाजकारण सोडले असा नाही. सत्ता नको, पण लोकांची सेवा, लोकांचे काम करतच राहायचे. ज्या भागात दलित, भटके विमुक्त, उपेक्षित या वर्गासाठी काही करता येईल ते करायचे हा माझा स्वतःचा निर्णय आहे. आता आपल्याला निवडूक नको हे मी ठरवले आहे. पण असे असले तरी राज्य व्यवस्थित चालावे यासाठी नवी पिढी तयार करायला पाहिजे.

पुढल्या ३० वर्षांची व्यवस्था करण्याची गरज

मी ३० वर्षांपूर्वी लोकसभा न लढवण्याचा निर्णय घेतला. कारण, ३०-३५ वर्षे सतत निवडून गेल्यानंतर नवी पिढी तयार करण्याची गरज असते. त्यानुसार मी इथली सर्व जबाबदारी अजित पवारांकडे सोपवली. मागील २५-३० वर्षांपासून ही जबाबदारी त्यांच्यावर आहे. पहिली ३० वर्षे माझ्यावर आणि त्यानंतरची ३० वर्षे अजित पवारांवर. आता पुढल्या ३० वर्षांची व्यवस्था करण्याची गरज आहे. ती करायची असेल तर लोकांमध्ये जाऊन त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यात लक्ष घालण्याची दृष्टी हवी, असे म्हणत शरद पवार यांनी यावेळी बारामतीची सर्व सूत्रे युगेंद्र पवार यांच्या हातात सोपवल्याचे सप्ष्ट केले.

युगेंद्र भक्कमपणे बारामतीचे प्रश्न सोडवेल

शरद पवार यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले, बारामती विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने युगेंद्र पवार यांना पाठिंबा दिला आहे. हे एक नवीन नेतृत्व आहे. त्यांना तुम्ही साथ दिली पाहिजे. काही लोक माझ्यावर भावनेचे राजकारण करण्याचा आरोप करतात. पण मला तसे काहीच करण्याची गरज नाही. मी माझ्या लोकांना ओळखतो. उद्याच्या निवडणुकीत आपण आपले प्रश्न सोडवूया. आता मला आमदारकी नको, खासदारकीही नको, मला केवळ लोकांचे प्रश्न सोडवायचे आहेत. उद्या आपल्या विचारांचे सरकार राज्यात आले तर युगेंद्र भक्कमपणे बारामतीचे प्रश्न सोडवेल.



# धनंजय मुंडेंचा आजपासून परळी मतदारसंघात प्रचाराचा झंझावात

**अंबाजोगाई तालुक्यात गाव भेट दौरा, परळीत आ.इंद्रिस नायकवडी यांच्या समवेत अल्पसंख्यांक मेळावा तर सायंकाळी व्यापारी संवाद मेळाव्याचे आयोजन बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात घेणार सभा**

परळी - राज्याचे कृषिमंत्री तथा महायुतीचे परळी विधानसभेचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांचा परळी मतदारसंघात उद्यापासून प्रचाराचा झंजावात सुरू होत असून, उद्या सकाळच्या सत्रात अंबाजोगाई तालुक्यात गाव भेट दौरा, दुपारच्या सत्रात राष्ट्रवादी अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आमदार इद्रिस नाईकवडी यांच्या समवेत परळी शहरात अल्पसंख्यांक मेळावा तर सायंकाळी व्यापारी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

महायुतीचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे उद्या (दि.०५) सकाळी आठ वाजता अंबाजोगाई तालुक्यातील राडी येथून गाव भेट दौऱ्यात सुरुवात करतील. त्यानंतर सकाळी नऊ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीस ऑनलाइन पद्धतीने उपस्थित राहतील, पुढे सकाळी साडेनऊ वाजता दैठणा राडी व त्यानंतर मुडेगाव आणि राडी तांडा येथील ग्रामस्थांशी संवाद साधतील. धनंजय मुंडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा विधान परिषद



सदस्य आमदार इद्रीस नायकवडी यांच्या उपस्थितीत परळी शहरातील व्हीआयपी फंक्शन हॉल येथे दुपारी दोन वाजता अल्पसंख्यांक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, या मेळाव्यास अल्पसंख्याक समाज बांधव तसेच महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन परळी शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे.

सायंकाळी साडेपाच वाजता अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा बुद्रुक येथे ग्रामस्थांशी संवाद साधून सायंकाळी आठ वाजता श्री मुंडे हे भागवत मंगल कार्यालय परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या व्यापारी मेळाव्यास उपस्थित राहणार असून या मेळाव्यास परळी शहरासह तालुक्यातील सर्व व्यापारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांनी केले आहे. दरम्यान धनंजय मुंडे हे स्वतःच्या परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारात सहभागी होणार असून राज्यभरातही धनंजय मुंडे यांच्या सभांना प्रचंड मागणी आहे. त्या सर्व ठिकाणी धनंजय मुंडे हे सभा घेणार असल्याचे धनंजय मुंडे यांच्या कार्यालयाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## परळी विधानसभा मतदारसंघात धनंजय मुंडे राजसाहेब देशमुख यांच्यात थेट लढत

**शरदचंद्र पवार गटाचे राजाभाऊ फड यांची माघार**

परळी । प्रतिनिधी

राज्याचे लक्ष वेधून घातलेल्या परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचे उमेदवार कृषी मंत्री. धनंजय मुंडे महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार राजे साहेब देशमुख यांच्यात दुरंगी लढत होणार आहे. तुल्यबळ म्हणून चर्चेत असणारे. राजेभाऊ फड यांची माघार घेतली आहे. परळी विधानसभा मतदारसंघात एकूण ५८ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी दहा उमेदवाराचे अर्ज त्यापैकी दहा उमेदवाराचे अर्ज छानणी मध्ये वैध ठरले आहे. तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे सोमवारी एकूण पस्तीस जणांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले आहे . यापूर्वी दोघ जणांनी उमेदवारी मागे घेतली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात आता अकरा उमेदवार राहिले आहे. अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार पक्षाचे युवक .नेते राजेभाऊ फड. अपक्ष उमेदवार राजेश देशमुख व प्रभाकर वाघमोडे व दिलीप बिडकर यांच्यासह ३७ जणांनी निवडणुकीच्या रिंगणातून आपली माघार घेतली आहे. यामुळे महायुतीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाचे धनंजय पंडितराव मुंडे व महाविकास आघाडीचेध राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे राजेसाहेब देशमुख या दोघांमध्ये सरळ





लढत होईल ११ उमेदवार आहेत त्यांना धनंजय पंडित मुंडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दिलीप आबा बिडकर प्रभाकर वाघमोडे युवक राम जाधव मुस्ताक मनोद्दीन शेख यांच्यासह एकूण ३७ जणांनी माघार घेतली आहे.-- मत विभाजन टाळण्यासाठी माघार राजेभाऊ फड परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मतात फूट पडून पक्षाचे नुकसान होऊ नये यासाठी मी निवडणुकीतून माघार घेतली. आगामी काळात तेवढे ताकतीने पक्षाचा कार्यकर्ता म्हणून मी काम करणार असल्याचे युवक. नेते राजेभाऊ फड यांनी सांगितले आहे. सोमवारी त्यांनी आपला अपक्ष भरलेला उमेदवारी अर्ज मागे घेऊन पक्षाचे काम निष्ठेने करणार असल्याची भूमिका त्यांनी जाहीर केली.


**गेवराईतून पंडित काका-पुतण्यासह विद्यमान**

## आ.लक्ष्मण पवार यांच्यात होणार तिरंगी लढत


**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : मतदारसंघात विधानसभा निवडणुकीत एकुण ४६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. यापैकी (दि. ४) शेवटच्या दिवशी २५ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून, गेवराईच्या राजकीय आखाड्यात आता २१ जण निवडणूक रिंगणात आहेत. मात्र खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे विजयसिंह पंडित शिवसेना उध्दव ठाकरे पक्षाचे बदामराव पंडित आणि अपक्ष विद्यमान आमदार लक्ष्मण पवार अशी तिरंगी लढत होणार आहे.**

गेवराई २२८ या विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीचे चित्र अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अमरसिंह पंडित, महेश दाभाडे, गीता







पवार, यशराज पंडित, यांच्यासह एकूण २५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. यामुळे गेवराईच्या आखाड्यात २१ उमेदवार असणार आहेत. यात खरी लढत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे विजयसिंह पंडित, शिवसेना उबाठा पक्षाचे बदामराव पंडित आणि अपक्ष विद्यमान आमदार लक्ष्मण पवार तिरंगी लढत होणार आहे.

गेवराईच्या मतदारसंघात रिंगणात उतरलेले उमेदवार

बदामराव पंडित(शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून) मयुरी खेडकर-मस्के(महाराष्ट्र नवनिर्माण सेना), विजयसिंह पंडित(राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट), दिलीप चांदणे (संपुर्ण भारत पार्टी), परमेश्वर वाघमोडे (जनहित लोकशाही पार्टी), पूजा मोरे (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी), प्रियंका खेडकर (वंचित बहुजन आघाडी), भीमा कानधरे (भारतीय युवा जन पार्टी), आण्णासाहेब मतकर (राष्ट्रीय समाज पक्ष) यांच्यासह अपक्षांत विद्यमान आमदार लक्ष्मण पवार, अशोक खेडकर, अंबादास जाधव, संजय काळे, पि. टी. चव्हाण, लक्ष्मण पवार, बदाम गोरडे, ऋषिकेश बेदरे, मनोहर चाळक, राजेंद्र डाके आणि सुरेश हत्ते हे निवडणूक रिंगणात आहेत.


## आष्टी विधानसभा मतदार संघात सुरेश धस,भीमराव धोंडे,बाळासाहेब आजबे, शेख महेबुब यांच्यासह १७ उमेदवार रिंगणात

आष्टी ( सुरेश कांबळे)

आष्टी विधानसभा निवडणुकीच्या निवडणुक रिंगणात १७ उमेदवार रिंगणात उतरले आहेत.यामध्ये माजी मंत्री सुरेश धस,विद्दमान आमदार बाळासाहेब आजबे,माजी आमदार भीमराव धोंडे व महेबुब शेख यांच्यासह १७ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. आता दिग्गज नेत्यांच्या म्हणण्यानुसार आष्टी विधानसभेत सुट्टा खेळ होणार आहे.त्यामुळे या मतदार संघात चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.आष्टी विधानसभेच्या निवडणुक रिंगणात उमेदवार पुढील प्रमाणे-३८ जणांची माघार १७ उमेदवार रिंगणात माजी आ.सुरेश धस (भाजपा),आ. बाळासाहेब आजबे (राष्ट्रवादी कॉग्रेस (अजित पवार गट), प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख (राष्ट्रवादी कॉग्रेस (शरद पवार गट),माजी आ.भीमराव धोंडे (रुई नालकोल) अपक्ष,कैलास दरेकर (आष्टी)मनसे,अक्षय आढाव (मातकुळी),ऋषिकेश विघ्ने (वाहीरा),प्रदिप चव्हाण (मुंबई),







शहादेव भंडारे (दासखेड),उमेश क्षीरसागर (चुबळी),शाहिर तुकाराम काळे (आष्टी),देविदास शिंदे (मातोरी), देविदास जायभाय (पिंपळनेर),संजय रक्ताटे (लोणी),गोकुळ सवासे (विघनवाडी),चांगदेव गिते (गितेवाडी), दिलीप माने(कारेगाव) हे आहेत.

निवडणुकीतुन माघार घेतलेले उमेदवार पुढील प्रमाणे-

माघार घेतलेले उमेदवार


फुलचंद खाडे (नायगाव),बापूसाहेब डोके (नगर),त्रिंबक झांबरे (हिगणी) राम खाडे (क-हेवाडी),शरद कांबळे (बीड), डा.शिवाजी राऊत (हनुमंतगाव), सागर आमले (अंभोरा),सुंदरराव जेधे (जाटनांदुर),नवनाथ आंधळे (आष्टा), जालींदर वांढरे (पांढरी), माजी आमदार साहेबराव दरेकर (कोयाळ),माधव साके (कानडी),अंकुश खोटे (मुगगांव),सतीष शिंदे (चिखली),महेश आजबे (शिराळ), भास्कर केदार (वारणी),ज्योती बेद्रे (अंमळनेर),अशोक पोकळे (चिंचाळा), विष्णुपंत घोलप (धनगर जवळका),कैलास जोगदंड (टाकळसीग),अमोल तरटे (डोईठाण),डा.अजयदादा धोंडे (रुईनालकोल), सुशिलाताई मोराळे (बानेगांव),नरसिंह जाधव (पाटोदा), अण्णासाहेब चौधरी (टाकळी),ज्ञानदेव थोरवे (सोलापूरवाडी),रविंद्र ढोबळे (कडा),वसंत काटे (शिरूर),जयदत्त धस (जामगांव),शिवाजी सुरवसे (पुंडी), अशोक दहिफळे (घोळेवाडी),राजेद्र जंरागे (आष्टी), सौ.सविता गोल्हार (बावी),सुरेश पाटील (बीड),राजु बांगर (मातावळी),मिरा साबळे (धामणगाव), बाळू गायकवाड (कुंसळब),चंद्रकला खटके (पिंपळा) यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.

# सोबत दोन खंजर बाळगणाऱ्यास पकडले बीड शहर पोलिसांची कारवाई



आगामी विधानसभा निवडणूक पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांनी गुन्हेगारां विरुद्ध मोहीम हाती घेतली असून या मोहिमेअंतर्गतच आज त्यांनी सोबत दोन खंजर बाळगण्यास अटक केली आहे. आज खात्रीशीर माहिती मिळाली होती की तकीया मस्जिद भागात अभिलेखावरील गुन्हेगार फिरोजखान हारूणखान पठाण, राहणार तकिया मज्जित जवळ, बीड. हातात खंजर घेऊन फिरत आहे आणि त्याच्या जवळ दोन खंजर आहेत. त्यामुळे त्या भागामध्ये दहशत पसरली आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्या ठिकाणी तात्काळ पोलीस टीम रवाना करण्यात आली आणि त्यांनी वरील आरोपीला रंगेहात एक मोठा खंजर आणि कमरेला छोटा खंजर असे दोन शस्त्रासह पकडले आहे. त्याच्यावर भारतीय शस्त्र कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी याच्यावर इरफान शेख रा. तकीय मशिद या इसमास चाकू दाखऊन १८०० रुपये लुटल्याची घटना या अगोदरच दाखल आहे. नमूद आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरील कारवाई, श्री. अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड आणि पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी बाबा राठोड , पोलीस अंमलदार गोवर्धन सोनवणे, तोंडे, जयसिंग वायकर, अश्फाक सय्यद व मनोज परजने यांनी केली आहे.



माझी सहाय्यक फौजदार नामदेव गणपत थोरात रा. बीड थोरातवाडी येथील रहिवासी पोलीस खात्यामध्ये एक मोठं नाव असलेले महाराष्ट्र यांचे चुलते होते त्यांचे दुःखद निधन झाले असून थोरात परिवाराच्या दुःखामध्ये सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ व नातेवाईक मित्रपरिवार सहभागी आहे.

# शासकीय रुग्णालय बीड च्या शल्य चिकित्सक व पोलीस चौकीच्या विद्यमाने मुख्य गेटवर रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा-अॅड.सदानंद वाघमारे

बीड(प्रतिनिधी)

शासकीय जिल्हा रुग्णालय च्या मुख्य गेटवर पोलीस चौकी व शल्यचिकित्सकाच्या आशीर्वादाने अतिक्रमण होत असून याकडे नगरपरिषद बीड मुख्याधिकारी व शासकीय जिल्हा रुग्णालयाची जिल्हा समिती व पोलीस चौकी यांच्या संयुक्त विद्यमाने अतिक्रमण होत असून याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ड.सदानंद वाघमारे यांनी केला आहे. या ठिकाणाहून नेहमीच रुग्णांची व नातेवाईकांची ये-जा होत असते. या ठिकाणी रस्त्यावरच मुख्य गेटवर अशा प्रकारचे अतिक्रमण होणे म्हणजे वाहतुकीला अडथळा



होत असून सामान्य नागरिकांना यामुळे मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. तरी जिल्हा प्रशासनाने तात्काळ सदरचे अतिक्रमण तात्काळ काढून घेण्याची मागणी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात ड.सदानंद वाघमारे यांनी वाघमारे यांनी कळविले आहे.

# इंडोनेशियामध्ये ज्वालामुखीचा उद्रेक, १० जणांचा मृत्यू

जकार्ता / वृत्तसस्था

इंडोनेशियाच्या पूर्वेकडील फ्लोरेस बेटावरील माउंट लिओटोबी लाकी-लाकी ज्वालामुखी येथे सोमवारी झालेल्या उद्रेकात १० जणांचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, रविवारी (३ नोव्हेंबर) सुमारे २४ मिनिटे ज्वालामुखीचा स्फोट झाला. यानंतर, रात्रभर त्याचा अनेक वेळा स्फोट झाला आणि सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास राखेचा ढग ३०० मीटर उंचीवर येताना



दिसले.

ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे डझनभर भूकंपही झाले. सध्या इंडोनेशिया सरकारने आणखी धक्के बसण्याची भीती व्यक्त केली आहे. ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे ७ गावांमध्ये राहणाऱ्या १० हजार लोकांचे नुकसान झाले आहे. यावेळी अनेक घरेही जळून खाक झाली.

लोकांनी सांगितले की, स्फोटानंतर आगीचे गोळे घरांवर पडल्यासारखे वाटत होते. लोक घर सोडून इकडे तिकडे धावू लागले. प्रशासनाने लोकांना ज्वालामुखीच्या ७ किलोमीटरच्या त्रिज्येपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.

ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर बचाव पथक घटनास्थळावरून लोकांचे मृतदेह काढताना दिसले.ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर बचाव पथक घटनास्थळावरून लोकांचे मृतदेह काढताना दिसले.५ गावे रिकामी करण्यात आली

एएफपीच्या पत्रकाराने सांगितले की, माउंट लाकी-लाकीजवळील ५ गावे रिकामी करण्यात आली आहेत. याशिवाय धुराचा प्रभाव टाळण्यासाठी लोकांना मास्क घालण्याचा सल्ला देण्यात आला आहे. ऑक्टोबरपासून, माउंट लाकी-लाकीचा ४३ वेळा उद्रेक झाला आहे. गेल्या आठवड्यात ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर राखेचे ढग ८०० मीटर उंचीवर येताना दिसले.जानेवारीपासून या ज्वालामुखीचा अनेकवेळा उद्रेक झाला असून, त्यामुळे सुमारे २ हजार लोकांना घरे सोडावी लागली आहेत. यापूर्वी गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये इंडोनेशियातील सर्वात सक्रिय ज्वालामुखीपैकी एक असलेल्या माऊंट मारापीच्या उद्रेकामुळे सुमारे २४ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यात विद्यापीठातील बहुतांश विद्यार्थी उपस्थित होते.२,८९१ किलोमीटर उंचीवर असलेल्या या ज्वालामुखीने सुमारे ३ किलोमीटर उंचीवर राखेचे लोट उठले होते. अल्जझीराच्या मते, इंडोनेशिया 'रिंग ऑफ फायर' क्षेत्रात येतो. पॅसिफिक महासागराजवळ घोड्याच्या बुटाच्या आकाराच्या टेक्टोनिक फॉल्ट लाईन आहेत. देशात १२० सक्रिय ज्वालामुखी आहेत.

# बीडमध्ये बंडखोरीत महायुती आघाडीवर

प्रतिनिधी । बीड

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत जिल्ह्यात उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी (ता. चार) लढतींचे चित्र स्पष्ट झाले. यात महायुतीत अधिक तर आघाडीत कमी बंडखोरी झाल्याचे चित्र आहे. आष्टीतून भीमराव धोंडे, बीडमधून अनिल जगताप, माजलगावमधून माधव निर्मळ व बाबरी मुंडे यांचे अर्ज कायम राहीले. नुकत्याच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या डॉ. ज्योती मेटे यांनी बीडमधून अर्ज कायम ठेवला. (इशशव छ्शुी) आष्टी विधानसभा मतदार संघात यापूर्वीच महायुतीत मैत्रीपुर्ण लढत स्पष्ट झाली आहे. भाजपने सुरेश धस तर राष्ट्रवादी काँग्रेसने आमदार बाळासाहेब आजबे यांना उमेदवार म्हणून रिंगणात उतरवले आहे. येथून भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आपली उमेदवारी कायम ठेवली आहे.

गेवराईचे आमदार लक्ष्मण पवार यांनी भाजपचा राजीनामा देत अपक्ष उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. पण, राष्ट्रवादी काँग्रेस शेतकरी आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष पुजा मोरे यांनी स्वराज्य पक्षाकडून उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. बीडमध्ये महायुतीची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला जाऊन डॉ. योगेश क्षीरसागर यांना उमेदवारी भेटली आहे. येथून शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल जगताप अपक्ष रिंगणात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनीही उमेदवारी कायम ठेवली आहे. (चरहर्ल्लीळ) माजलगावमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने प्रकाश सोळंके यांना उमेदवारी दिली आहे. येथून राष्ट्रवादीचे माधव निर्मळ तसेच भाजपचे बाबरी मुंडे यांनी आपले अर्ज कायम ठेवले आहेत. राष्ट्रवादी




काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले रमेश आडसकर यांनीही अपक्ष उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे.

दरम्यान, बीड मतदार संघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेले माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी अचानक माघार घेतली. यासह माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनीही बीडमधून माघार घेतली. केजमधून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या माजी आमदार प्रा. संगीता ठोंबरे यांनी माघार घेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पृथवीराज साठे यांना पाठींबा जाहीर केला. परळीतून राष्ट्रवादीतून बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या राजाभाऊ फड यांनीही माघार घेतली. एकूणच बीड जिल्ह्यात महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरीचे पीक उंदड झाल्याचे चित्र आहे.

# परळीतून राजेभाऊ फड यांची माघार

## धनंजय मुंडे- राजेसाहेब देशमुख यांच्यात थेट लढत

प्रतिनिधी । बीड

राज्याचे लक्ष वेधून घेतलेल्या परळी विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार कृषी मंत्री धनंजय मुंडे व महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यात दुरंगी लढत होणार आहे.परळी विधानसभा मतदारसंघात एकूण ५८ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी दहा उमेदवारांचे अर्ज छाननी मध्ये अवैध ठरले होते. ४८ उमेदवारांचे अर्ज छाननी मध्ये वैध ठरले होते. तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे सोमवारी एकूण ३५ जणांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले आहे. यापूर्वी दोघाजणांनी उमेदवारी मागे घेतली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या रिंगणात आता ११ उमेदवार राहिले आहे. अपक्ष उमेदवारी दाखल केलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड, अपक्ष



उमेदवार राजेश देशमुख व प्रभाकर वाघमोडे, दिलीप बिडगर यांच्यासह एकूण ३७ जणांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. यामुळे महायुतीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाचे धनंजय पंडितराव मुंडे व महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजेसाहेब श्रीकिशन देशमुख या दोघांमध्ये सरळ लढत होईल.

### ११ उमेदवार आहेत रिंगणात:

- धनंजय पंडितराव मुंडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादा पवार गट , राजेसाहेब श्रीकिशन देशमुख राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, डी एल उजगरे बहुजन समाज पार्टी, केदारनाथ जाधव पीजेंट्स अँड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया. भागवत वैद्य विकास इंडिया पार्टी , साहस आदोडे मराठवाडा मुक्ती मोर्चा, अल्ताफ खाजा मिया सय्यद अपक्ष ,दयानंद लांडगे अपक्ष, राजेसाहेब सुभाषराव देशमुख अपक्ष ,शाखेर अहमद शेख अपक्ष, हिदायत सादिक अली सय्यद अपक्ष यांचा समावेश आहे. ...

### यांनी घेतली माघार :

- राजाभाऊ श्रीराम फड, जयवंत ऊर्फ राजेश देशमुख, दिलीप बिडगर, प्रभाकर वाघमोडे, राजश्री धनंजय मुंडे, प्रमोद बिडगर, सेवकराम जाधव, मुस्तफा मैनोदीन शेख यांच्यासह एकूण ३७ जणांनी माघार घेतली आहे.

# भीषण अपघात, बस दरीत कोसळून ३६ प्रवाशांचा मृत्यू

प्रतिनिधी । बीड

उत्तराखंडच्या अल्मोडा या ठिकाणी एका प्रवाशी बसचा भीषण अपघात झाला आहे. मार्चुला परिसरात प्रवाशांनी भरलेली बस दरीत पडल्याची माहिती मिळत आहे. जवळपास ४० प्रवाशांनी भरलेली बस खोल दरीत कोसळली आहे. सध्या या ठिकाणी डऊठ्ठ आणि पोलीस प्रशासनाकडून बचावकार्य सुरु असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अल्मोडा एसपींनी अपघातात २० जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे.आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विनीत पाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'सल्ट आणि रानीखेत येथून काही बचावपथके घटनास्थळी पाठवण्यात आली आहेत. या दुर्घटनेत आतापर्यंत १५ जणांचा मृत्यू झाला आहे. सध्या बचाव कार्य वेगाने सुरु आहे. या दुर्घटनेत नेमका किती लोकांचा मृत्यू झाला, याची माहिती बचावकार्य पूर्ण झाल्यानंतरच सांगता येईल. या दुर्घटनेत मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



### बचावकार्य वेगाने सुरु

- या ठिकाणी सध्या मोठ्या वेगाने बचावकार्य सुरु आहे. तसेच या दुर्घटनेदरम्यान जखमी झालेल्या प्रवाशांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच डऊठ्ठ आणि पोलीस प्रशासनाकडून मदत कार्य सुरू करण्यात आले आहे.

### चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले

- मिळालेल्या माहितीनुसार, एक प्रवाशी बस आज सकाळी गौरीखालहून रामनकगरडे निघाली होती. यावेळी बसमध्ये साधारण ४० पेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करत होते. यावेळी गढवाल-रामनगर मार्गावरील सल्ट गावाजवळ असलेल्या वळणावर चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. यानंतर अवघ्या काही क्षणातचं ही प्रवाशी बस खोल दरीत कोसळली.अनेक प्रवाशांनी बस खाली कोसळताच आरडाओरड सुरु केली. या दुर्घटनेदरम्यान काही प्रवाशी हे बसमधून बाहेर फेकले गेले. आतापर्यंत या दुर्घटनेत १५ पेक्षा जास्त प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. काही जखमी प्रवाशांनी सकाळी नऊच्या सुमारास नियंत्रण कक्षाला याबद्दलची माहिती दिली होती.

# गस्ती दरम्यान एक लाखाची रोकड जप्त

बीड प्रतिनिधी

महाराष्ट्र सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या कार्यक्रमात जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड यांनी बीड तालुक्यातील विविध विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी निवडणूक कामी नियुक्ती चे आदेशानुसार अधिकारी कर्मचारी यांचे पथक, एस.एस.टी / व्ही.एस.टी /व्ही.व्ही. टी आणि एफ.एस.टी तैनात करण्यात आले आहे. बीड येथील फिरते पथक क्र ७ चे पथक प्रमुख श्री. पी.व्ही. लोकरे यांची टिम ने श्री. प्रशांत जाधवर नायब तहसीलदार बीड यांचे मार्गदर्शनाखाली बीड येथील शिवाजीनगर नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत शिवराज पान सेंटर येथे विविध वाहनाची तपासणी करीत होते एका कार क्रमांक चक१२ ऋ७९९४ ची तपासणी एन कॅमेरा मध्ये करण्यात आली या मध्ये अवैधरित्या एक लाख रुपये बाळगल्या प्रकरणी वाहन चालक श्री शेख हारून शेख अनिस रा खासबाग बीड व त्यामधील बसलेल्या लोकांना विचारले असता कोणी ही पैश्या संदर्भात पुरावेनीशी



उत्तर देऊ शकले नाही.

१) एफएसटी पथकाने एक लाख रुपये जप्त करून महसूल विभागाचे स्वाधीन केले २) गाडी जप्त ना करता सोडून दिले. ३) गुन्हा दाखल करण्याची कारवाही अद्याप नाही ४) पैशे कोणाकडे आहे शासन दरबादी जमा केले आहे. ५) पोलीस अंमलदार श्री ढाकणे एस ए (२०११) व श्री बांगर एस यांनी सहकार्य केले ६) बीड जिल्ह्यातील अश्या कामगिरी केलेले लोकांची जनते कडून प्रशांसा करण्यात येत आहे. ७) भरारी पथक जिल्ह्यात अश्या इमानदारीने पथक रात्र दिवस काम करीत आहे त्यांना निवडणुकीचे भत्ता पण देणे बाबत विचार होणे अपेक्षित आहे लोकसभेला तीन महिने पथक काम केले भत्ता नागण्या सारखा देण्यात आले. विधानसभा निवडणूक मध्ये सर्वांना दिवाळी भेट म्हणून या पथकाना शासन जि आर नुसार एक बेसिक तरी द्यावे या बाबत अशी विनंती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी लक्ष द्यावे.

# योगेश कानडे व मित्र परिवाराचा विजयसिंह पंडितांना जाहीर पाठींबा

टाकरवन (प्रतिनिधी)

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद भेटत आहे यातच टाकरवण येथील भाजपचे कार्यकर्ते योगेश कानडे यांनी युतीचे उमेदवार म्हणून विजयसिंह पंडित यांचा प्रचार करणार असल्याचे कृष्णाई येथे अमरसिंह पंडित यांची भेट घेऊन जाहीर केले. सुसंस्कृत,

युवा , सर्वगुणसंपन्न उमेदवार म्हणून यावेळी लोकांनी विजयसिंह पंडित यांना गेवराई विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी द्यावी ते नक्कीच तरुणांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटीबद्ध असतील असा विश्वास व्यक्त केला व आपण तन मन धनाने काम करुन टाकरवण मधुन विजयराजेंना लीड देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले.



विजयी करण्याचे केले अवाहन



प्रतिनिधी : वचिष्ट आठवे

जाहीर प्रवेश .. विजयराजेंना बळ देण्यासाठी खेर्डावाडी येथील भारतीय जनता पार्टीचे कट्टर युवा समर्थक विकास भिसे,राहूल भिसे, अभिजित भिसे,अनिल भिसे, बाबासाहेब भिसे,लखन भिसे,आणि यांच्या सर्व सहकार्याणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांच्या हस्ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षा मध्ये जाहिर प्रवेश केला या वेळी कार्यक्रमाला मारोती भिसे, दादाराव रोकडे, बाबासाहेब रडे,गोवर्धन कादे, धम्मा त्रिभुवन यांच्या उपस्थिती पार पडला.

# आमदार प्रकाश सोळंकेला दलितांचा पडला विसर

## पुरुषोत्तमपुरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाला अभिवादन न करता पुढे निघून गेले

माजलगाव । सुनिल थोरात

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे प्रकाश सोळंके यांचा जयदत्त नरवडे यांच्या मळ्यामध्ये मेळाव्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता या कार्यक्रमाचे अनुषंगाने प्रकाश सोळंके हे पुरुषोत्तमपुरी येथे आले असता डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाला अभिवादन न करता गावात निघून गेल्यामुळे दलित समाजाच्या वतीने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. प्रकाश सोळंके यांनी चार वेळा आमदारकी ही दलितांच्या मतावर भोगली आमदार राहिले पण आता त्यांना दलित वस्ती दिसत नाही. प्रकाश सोळंके यांना कोणता घमंड आलेला आहे. अशी चर्चा पुरुषोत्तमपुरी येथील



दलितांमध्ये दिसून येत आहे. येणारा प्रत्येक उमेदवार हा या दोन महापुरुषांच्या स्मारकाला अभिवादन केल्याशिवाय गावात जात नाहीत पण विद्यमान आमदार प्रकाश सोळंके या महापुरुषांच्या स्मारकाला अभिवादन न करता गावात निघून जातात याचा येथील दलित बांधवांमध्ये तीव्र रोष दिसून येत आहे.

पुरुषोत्तमपुरी येथे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके हे आले होते त्यांचा मेळाव्याचा कार्यक्रम जयदत्त नरवडे यांच्या मळ्यामध्ये आयोजित करण्यात आलेला होता. त्यामुळे त्यांनी पुरुषोत्तमपुरी येथे भेट दिली पण पुरुषोत्तमपुरी येथे प्रचार निमित्त येणारा प्रत्येक उमेदवार हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाला अभिवादन केल्याशिवाय पुढे जात नाही. आणि दलित समाज बांधवांशी चर्चा केल्याशिवाय पण पुढे जात नाही.

पण प्रकाश सोळंके हे गावात आल्यानंतर कोणत्याही दलित बांधवांशी चर्चा करत नाहीत किंवा महापुरुषांना अभिवादन करत नाहीत यामुळे याचा तीव्र रोष या दलित समाज बांधवांतून दिसून येत आहे आणि हा रोष येथील समाज बांधव मतदानातून प्रकाश सोळंके यांना दाखवून देणार आहेत. प्रकाश सोळंके यांनी चार वेळेस दलितांच्या मतावर आमदारकी भोगली पण यांना आता कोणता माज आलेला आहे असा सवाल दलित बांधवांच्या वतीने करण्यात येत आहे - सुनिल थोरात.

# खोटे आश्वासने देऊन नाही तर विकासाच्या जोरावर मी पुन्हा मैदानात - आ.लक्ष्मण पवार

गेवराई (प्रतिनिधी)

निवडणुकीच्या तोंडावर खोटे आश्वासने देऊन लोकांची दिशाभूल करत मतदारांच्या समोर हात पसरवणाऱ्यांना जनता ओळखून चुकली आहे. गेवराई मतदार संघात मागील १० वर्षात गाव-वाडी -वस्ती-तांड्यापर्यंत केलेली विकास कामे हीच आपली ताकद असून याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा विधानसभेच्या मैदानात उतरलो असल्याचे प्रतिपादन आ.लक्ष्मण पवार यांनी केले.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आ. लक्ष्मण पवार यांनी तलवाडा येथील त्वरिता देवी मंदिर येथे जेष्ठांच्या हस्ते नारळ फोडून आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. यानंतर त्यांनी तलवाडा, राहेरी, भोगलगाव, गंगावाडी, आंतरवली यासह ठिकठिकाणी कॉर्नर सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, विरोधक हे प्रत्येक निवडणुकीच्या तोंडावर मतदारांच्या दारात जाऊन खोटे आश्वासने देत मतदारांची दिशाभूल करून हात पसरवत आहेत. परंतु तालुक्यातील सर्व मतदार जनता हुशार असून ते विकासाच्या पाठीशी असल्याचे गेल्या दोन विधानसभा निवडणुकीत दिसून आले आहे. त्याच प्रमाणे गेल्या दहा वर्षांत केलेल्या विकास कामाची पावती म्हणून जनता या निवडणुकीतही आपल्या




तलवाड्याच्या त्वारितादेवीचे दर्शन घेऊन नारळ वाढवून आ.लक्ष्मण पवारांनी केला प्रचाराचा शुभारंभ

सोबत राहील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. एका लोकप्रतिनिधीने प्रामाणिकपणे काम केले तर मतदार संघाचा किती विकास होऊ शकतो हे आपण गेल्या दहा वर्षाच्या काळात दाखवून दिले आहे. मी दहा वर्षे आमदार होतो या काळात मला साडेसात वर्ष सत्ता काळातील मिळाली अन याच काळात आपण तळागाळातील जनतेसाठी होईल तेवढे प्रयत्न करून मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला म्हणून आज आपल्या गावगावच्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. म्हणून गेल्या दहा वर्षात केलेली विकास कामे हीच आपली ओळख असून याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा अपक्ष उमेदवार म्हणून या विधानसभेच्या मैदानात उतरलो असून येत्या २० तारखेला सर्व मायबाप मतदार आपल्या ऑटोरिक्षा या चिन्हसमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने मला विजयी करून हा विकास रथ असाच कायम पुढे चालू ठेवतील असा विश्वास आ.लक्ष्मण पवार यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

यावेळी मतलवाडा सर्कल मधील गंगावाडी, राहेरी, बोरगाव थडी, येथे भेटीगाठी दौरा सुरू केला. यावेळी सुशील जंवजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर, जे.डी.शहा, भगवान घुबार्डे, दादासाहेब गिरी, राजेंद्र भंडारी, मधुकर वादे,शिनुभाऊ बेद्रे, सतिष दाभाडे, याहीया खॉन, शाम कुंड, सय्यद एजाज, देविदास फलके, शेख मोहम्मद, अभिजीत मरकड, अँड सुरेश पवार, काठोड्याचे सरपंच आबु कर्वे, रामेश्वर मस्के,शांलिदर बाबासाहेब कोरे, मतीन कुरेशी, भारत खटके, विष्णु गायकवाड, कृष्णा गायके, पुरूषोत्तम लाड,गोपाल लाड,अगद फलके, शेख मौहमद,राहुल बेडके,विलास तळेकर, अदिनाथ गर्जे, भास्कर गवते, गोरे मामा, यांच्यासह परिसरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते तसेच मतदार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सामाजिक कार्याची दिल्लीवरून दखल

## मानवी हक्क अभियान तालुका सचिव पदी कपिल आडागळे यांची निवड

टाकरवन (प्रतिनिधी )

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील सामाजिक कार्यकर्ते व भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ श्री.कपिल आडगळे यांचे सामाजिक क्षेत्रात मोठे कामगिरी असल्या मुळे त्यांना मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी दिल्ली चे प्रोफेसर डॉ. मिलिंद (नाना) एकनाथ आव्हाड यांनी, श्री.कपिल आडागळे यांच्या सामाजिक कार्याची दिल्ली वरून दखल घेऊन मानवी हक्क अभियान चे माजलगाव तालुका सचिव पद देऊन गौरविण्यात आले.

सविस्तर बातमी कपिल आडागळे यांचा सामाजिक क्षेत्रात मोठी कामगिरी असल्यामुळे त्यांच्या कामाला संघटनेच्या माध्यमातून बळ मिळो म्हणून मानवी हक्क अभियान तालुका सचिव पदी निवड करण्यात आली डॉ.मिलिंद (नाना) आव्हाड यांच्या हस्ते त्यांनी संघटनेचे प्रमाणपत्र हस्तगत करून या पदाचा पदभार



स्वीकारण्यात आला . या पदी निवड झाल्यामुळे समाजातून त्यांची मोठ्या प्रमाणात वा वा होतानी दिसत आहे यावेळी संघटनेचे सर्व पदाधिकारी व मान्यवर मा मधुकर कांबळे, कचरू कांबळे, बाबासाहेब थोरात, बबन खंडागळे, बंडू खंडागळे, प्रल्हाद दळवी, संदीप वाघमारे, प्रकाश थोरात, सुनिल थोरात, आकाश लोखंडे, अक्षय थोरात, मच्छिंद्र उपाडे, संकेत खंडागळे, अनिकेत वाघमारे, बालासाहेब आडागळे मोठ्या संख्येने उपस्थित होते

## बीड शहराच्या जवळच असलेल्या शेत जमिनीवर नगरपालिकेतील

# कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी बोगस गुंठेवारी करुन शासनाचा करोडो रुपये महसूल बुडवला केके वडमारे

बीड शहरापासून जवळ असलेल्या आजूबाजूच्या परिसरामध्ये बीड नगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचारी यांनी बोगस खोटी गुंठेवारी करून पी टी आर तयार केले आहे यामुळे बीड नगरपालिकेचा महसूल या कर्मचाऱ्यांने अधिकाऱ्यांनी स्वतःच्या घशात घातला आहे नगरपालिकेमध्ये गेल्या तीन वर्षापासून प्रशासक असल्यामुळे सर्व काही नगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी संगनमताने शहराती टॅक्स चे पैसे गुत्तेदारांना खैरातीसारखे बिल काढून स्वतःची टक्केवारी घेत आहे घरपट्टी असेल नळपट्टी असेल टॅक्स असतील या नियोजिन नगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील प्रमुख प्रश्न सोडवण्यासाठी उपयोग झाला पाहिजे मात्र नगरपालिकेच्या मुख्य अधिकारी सिओ अंधारे मॅडम स्वतःच्या मर्जीतील गुत्तेदाराना पैसा बिलाच्या स्वरूपात देऊन स्वतःची टक्केवारी घेत आहेत बीड शहरापासून जवळ असलेल्या बार्शी रोड परिसरात तेलगाव रोड बार्शी नाका तसेच बलगुजर या परिसरामध्ये प्लॉटिंगचे नावाखाली पी टी आर ला नाव लावून बोगस गुंठेवारीच्या पावत्या जोडल्या जात आहेत नगरपालिकेतील काही रिटायर कर्मचारी आणि नगरपालिकेचे सीईओ यांचा संगनमत आहे या बाबतीमध्ये बीड जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन या प्रकरणांमध्ये सखोल चौकशी करून बोगस प्लॉटिंग प्रकरणात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची मागणी करणार आहे अन्यथा लोकशाही मार्गाने उपोषण करणार आहे बीड नगरपालिकेमध्ये कोणताही काम असो अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पैसे दिल्याशिवाय ते काम केलं जात नाही याबाबतीत सुद्धा माझ्याकडे अनेक व्हाट्सअप चे मेसेज आहेत यामध्ये पैसे मागितले जात आहेत कॉल रेकॉर्डिंग सुद्धा आहेत बीड शहरातील बांधकाम व्यवसाय असेल प्लॉटिंग धारक असतील यांच्याकडून पैसे घेतल्याशिवाय कोणताही काम बीड नगरपालिकेचे सिओ अंधारे मॅडम करत नाहीत पैसे घेण्यासाठी विशेष यंत्रणा आहे याबाबतीत चे सर्व पुरावे बीड जिल्हाधिकारी यांच्यासह प्रशासनासमोर आपण मांडणार आहोत गेल्या अनेक महिन्यांपासून बांधकाम परमिशन साठी अनेक अर्ज नगरपालिकेत येऊन ऑनलाईन पद्धतीने आले आहेत मात्र जोपर्यंत पैसे दिले जात नाही तोपर्यंत ऑनलाईन परमिशन दिली जात नाही तृतीया नावाखाली जशास तसे पेंडिंग प्रकरण ठेवलं जात आहे व्हाट्सअप कॉलिंग च्या माध्यमातून पैशाची मागणी केली जाते मेसेज वरून आकडा सांगितला जातो जोपर्यंत पैसे दिले जात नाही तोपर्यंत बीड नगरपालिकेच्या माध्यमातून कोणतेही काम होत नाही बांधकाम परमिशन घराचे असेल किंवा रोज असेल किंवा व्यावसायिक कमर्शियल बिल्डिंगची असो यामध्ये लाखो रुपयांचा अपहार बीड नगरपालिकेचे सिओ अंधारे मॅडम यांच्याकडून होत आहे याबाबतीत चे पुरावे एसीबी ऑफिसला सुद्धा आम्ही सोमवारी देणार आहोत असे प्रसिद्ध



दिलेल्या पत्रकात के के वडमारे यांनी म्हटल

# पक्षात येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही



बीड (प्रतिनिधी)

बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नेते, पदाधिकाऱ्यांच्या प्रवेशाचा ओघ सुरूच आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या विचाराने प्रेरित होवून अनेकांनी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष तथा महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन दरदिवशी प्रवेश सोहळे होत आहेत. पक्षात येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

बीड तालुक्यातील तळेगाव येथील माजी उपसरपंच गणेश घोलप, माजी ग्रा.पं.सदस्य गंगाराम महाकुडे, ग्रा.पं.सदस्य सिद्धार्थ महाकुडे, अशोक घोलप, रितेश सौदा, मंगेश वाघमारे, आकाश महाकुडे आदींनी प्रवेश केला. हिवरापहाडी, अंजनवती येथील रमेश जाधव, भिमराव पालवे, अशोक पालावे, बंडू गोरे, अंनत शिंदे, राहुल आनेराव, गोकुळ शिंदे, आंधारीनाथ काबळे, समीर पालवे, नारायण देवकते आदींनी प्रवेश केला. अंजनवती येथील अशोक शिंदे, अनिल शिंदे, अविनाश शिंदे, राम शिंदे, दत्ता शिंदे, राहुल शिंदे, बप्पा शिंदे, बन्सी शिंदे, रामहरी येडे, कृष्णा शिंदे, मेघराज येडे, संतोष शिंदे, सुरेश टाकळे आदींनी प्रवेश केला. रायमोहा येथील माजी सरपंच शेख हाशम यांच्यासह सोहेल शेख, प्रदीप जाधव, बाळासाहेब मिसाळ, उद्धव विघ्ने, टाकळवाडीचे उपसरपंच रामहरी कदम, माजी उपसरपंच सुदाम नागरे, काळू नागरे, भाऊसाहेब जायभाय, लाला पठाण, चेअरमन रशीद पठाण, महेश चव्हाण, लहू गायकवाड, बाबू समगे, शमशेर पठाण, मोहसीन पठाण, राम पालवे, बाळू गणपत, राजू सानप, श्रीकांत विघ्ने, लियाखत शेख, योगेश तांबारे, जालिंदर नेमाने, भरत कोकाटे, गणेश कंठाळे, अजिंक्य जाधव, मुन्ना पठाण, गणेश सानप, साहिल शेख, कैलास पवार, अविनाश काळे, प्रेम काळे, भगवान चव्हाण, युवराज चव्हाण, प्रल्हाद चांदणे, अक्षय सानप, रोहन पवन चांदणे, कैलास पवार, ओम चांदणे आदींनी प्रवेश केला.

बीड शहरातून दरदिवशी होतायेत प्रवेश

बीड शहरातून दरदिवशी प्रवेश होत असून तेरवी लाईन, अजिजपुरा भागातील युवा नेते केशव रत्नपारखे यांच्यासह अनेक तरुण, महिलांनी पक्षात प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, नाळवंडीचे सरपंच ड.राजेंद्र राऊत, नगरसेवक रवींद्र कदम, संदीप डावकर, शुभम कातांगळे, शैलेश गिरी, नंदन पवार, विशाल मोरे, विक्रम चव्हाण, अनिल देवतरासे आदी उपस्थित होते.

## नीळकंठेश्वर महादेव मंदिरात डॉक्टर दाम्पत्याकडून आरती


बीड शहरातील नीळकंठेश्वर महादेव मंदिरात डॉ.योगेश व डॉ.सारिकाताई यांनी मनोभावे आरती केली व दर्शन घेतले. यावेळी माजी नगरसेवक नामदेवराव दुधाळ, पानखडे, गोरे, घोडके महाराज, विद्याभुषण बेदरकर, गोरख यादव, राजेंद्र गोरे, रामचंद्र ढोले, कैलास पांचाळ, प्रकाश मोरे, भाग्यश्री पांचाळ, माजेद कुरेशी आदी उपस्थित होते.

## संदीप भैय्या क्षीरसागर यांना आमदार करण्यासाठी युवकांची फौज उभी करणार:- अथर्व मस्के



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील सर्व नेते तयारीला लागले आहेत. गावोगावी जाऊन मतदारांसोबत बैठका घेऊन संवाद साधत आहेत. मात्र कोणी कितीही ताकद दाखवली तरी बीड शहरात परत एकदा आमदार म्हणून संदीप भैय्या क्षीरसागर यांनाच निवडून आणायचे आहे यासाठी कार्यकर्ते तयारीला लागले आहेत. जीवाच रान करू रात्रीचा दिवस करू तरुणांना एकत्र करत मोठी ताकद उभी करून यावेळेस ही संदीप भैय्यांना आमदार करू असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(शरदचंद्र पवार गट) चे युवा नेते अथर्व मस्के यांनी केला आहे. बीड मतदारसंघात सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणारे,कार्यकर्त्यांच्या जीवाला जीव देणारे, सगळ्यांना सोबत घेऊन चालणारे,सदैव सर्वसामन्याच्या सुखा दुःखात सावली प्रमाणे सोबत असणारे युवकांच्या हक्काचे नेते म्हणून संदीप भैय्यांची ओळख आहे. बीड शहरातील जनतेच्यापाठी भैय्या कायम उभे आहेत त्यांचीच पोहच पावती म्हणून संपूर्ण युवक एकजुटीने संदीप भैय्यांचा पाठीशी उभे आहेत. या सर्व युवकांची फौज उभी करत संदीप क्षीरसागरांना विजय करण्याचा मोठा निर्धार अथर्व मस्के यांनी पत्रक काढत जाहीर केले.

## पक्षादेश व धर्मगुरूंचा आदेश माझ्यासाठी अंतिम म्हणून निवडणुकीतून माघार - ॲड. शेख शफीक भाऊ




बीड (प्रतिनिधी)

सेक्युलर मतांचे ध्रुवीकरण होऊ नये, जातीयवादी शक्तींना बळ मिळू नये. याकरिता पक्षाने दिलेले आदेश व धर्मगुरूंचे आदेश माझ्यासाठी अंतिम म्हणून निवडणुकीतून माघार घेतल्याचे एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, समाजातील नेतृत्वामध्ये एक मत झाले नाही. तसेच पक्ष उमेदवारीसाठी अनुकूल नव्हता. तरीसुद्धा जनतेच्या दबावामुळे व विनंतीस मान देऊन अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र शेवटच्या क्षणापर्यंत सुद्धा एकमत होत नसल्याने उमेदवारी अर्ज मागे घेतला. कारण पक्ष महाराष्ट्रात जास्त जागा लढवून जातीय शक्तींना लाभ होऊ देण्याच्या विचारात नाही. जिथे जातीय शक्ती असलेल्या पक्षांचे उमेदवार आरामात निवडून येऊ शकतील अशा जागी आपल्याकडून कोणतीही चूक करण्यास पक्ष तयार नाही. जेणेकरून आपल्याकडून जातीय शक्तींना बळ मिळू नये. जिथे जातीय शक्तींचे उमेदवार पाडून आपण आपल्या पक्षाचे उमेदवार निवडून आणू शकतो अशाच ठिकाणी पक्षाने उमेदवार दिले आहे. जातीयवादी शक्तींना रोखण्यासाठी सेक्युलर विचारसरणी असलेल्या लोकांनी एकत्र येऊन आपला उमेदवार ठरविणे आवश्यक होते परंतु शेवटच्या क्षणापर्यंत सुद्धा यावर एकमत होऊ शकले नाही. आपण आपल्या परीने एकाच उमेदवारीसाठी खूप प्रयत्न केले परंतु अंतिम निर्णय होऊ शकला नाही. सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. यामुळे निवडणुकीत जातीयवादी शक्तींना आपल्या उमेदवारीमुळे लाभ होऊ नये म्हणून पक्षाने दिलेला आदेश तसेच धर्मगुरूंनी दिलेले आदेश आपण शिरसावंद्य मानून बीड विधानसभा मतदारसंघातून भरलेला अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. असे मत एआयएमआयएम चे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

# जरांगे पाटलांच्या भूमिकेनंतर सुर्वेंची पोष्ट सोशल मीडियावर झळकली

## कोणी कुठेही जा मी भाजपा मधेच राहणार - संभाजी सुर्वे



बीड (प्रतिनिधी)

सध्या राज्यभर विधानसभा निवडणुकीचे वातावरण असल्याने सर्व महाराष्ट्राचे जरांगे पाटील यांच्या भुमिकाकडे लागले होते. अशात त्यांनी निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले. त्या नंतर भाजपाचे संभाजी सुर्वे यांनी आपल्या सोशल मीडियावर एक बाँडची पोष्ट केली आहे. या मध्ये ते असे म्हणतात की,आळंदी ते पंढरपूर पालखी महामार्गाची संकल्पना, पंढरपूर मध्ये वारकरी भवन बांधकाम संकल्पना, नागपूर ते मुंबई समृध्दी महामार्ग संकल्पना, शक्तीपीठ महामार्गाची संकल्पना, जलयुक्त शिवार संकल्पना, गावागावात शेत तळी संकल्पना, महाराष्ट्रातील मेट्रो रेल प्रकल्पाचे शिल्पकार, मुंबई मधील सी लिंक रोड, अटल सेतू , कोस्टल रोड, लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवठा या सर्व संकल्पना देवेंद्र फडणवीस यांच्या आहेत. अशा हजारो कामांची आखणी करून ही सर्व कामे युती सरकारने पूर्ण केली आहेत. युती सरकारचे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी या सगळ्या कामांना सुरुवात केली होती.महाराष्ट्र विकासाचे शिल्पकार देवेंद्रजी फडणवीस साहेब हेच आहेत.

मराठा आरक्षणावर बोलायचे झाले तर देवेंद्र फडणवीस साहेब यांनीच मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण दिले आहे.आणि उच्च न्यायालयात टिकऊन देखील दाखवले. परंतु यात फडणवीस साहेब यांचे नाव अजरामर होईल म्हणून महाविकास आघाडी ने जाणीवपूर्वक सर्वोच्च न्यायालयात आरक्षण घालवन्याचे महापाप केले. सुप्रीम कोर्टात केस गेली तेव्हा देवेन्द्रजी मुख्यमंत्री नव्हते.असते तर तिथं ही १००% टिकवून दाखवलं असतं.मराठ्यांना एथड मध्ये आरक्षण सर्वप्रथम फडणवीस यांनीच दिले.सारथी व आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणारे फडणवीसच होते.मराठ्यांच्या लेकरांना मोफत वसतिगृह, र्ििल मध्ये वयोमर्यादा वाढ ही फक्त फडणवीस साहेब यांचीच मराठ्यांना देण आहे.आता लागू असलेले स्वतंत्र ते ईडब्लूएस असो वा एसईबीसी असो. मराठा समाजाला दिलेले १० टक्के आरक्षण देखील फडणवीस साहेबांनीच दिले आहे.तरीही माझा समाज फडणवीस यांनाच शिवीगाळ करतो ? माझा मराठा समाज इतका अहसान फरामोश कधी झाला ? जसे फडणवीस छाती ठोक पने सांगतात की मी माझे सरकार असताना मराठा समाजासाठी काय काय केले तसे इतक्या वर्ष ढेकना सारखे मराठा समाजाचे रक्त पिणाऱ्या त्या शरद पवार यांना एकदा विचारा इतकी वर्षे सत्तेत असताना आपण मराठा समाजासाठी काय केले ? असा मजकूर भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे यांनी केलेल्या सोशल मिडियाच्या पोष्टवर आहे.

# साखर कारखाने गळीत हंगाम शुभारंभ परवाना दिनांका मध्ये बदल होण्याची शक्यता

## कारखानदार आणि मुकादम यांनी ऊस तोडणी कामगारांना पाठवण्याची घाई करू नये - माजी मंत्री सुरेश धस



आष्टी (प्रतिनिधी)

**महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांचे गळीत हंगाम सुरू करण्याच्या क्रशिंग लायसन्स तारखे मध्ये बदल होण्याची शक्यता असल्याची आपली माहिती असून अधिकृत घोषणा लवकरच होणार असल्यामुळे कारखानदार आणि मुकादम यांनी ऊस तोडणी**

कामगारांना कारखान्यांकडे पाठवण्याची घाई करू नये असे आवाहन माजी मंत्री सुरेश धस यांनी केले आहे समाज माध्यम प्रतिनिधीशी बोलताना ते पुढे म्हणाले की दिनांक १५ ऑक्टोबर या दिवशी गळीत हंगाम सुरू करणे बाबतचे कृषी लायसन्स ची तारीख नियोजित होती परंतु महाराष्ट्र राज्यातील धुळे नंदुरबार छत्रपती संभाजी नगर जालना परभणी नांदेड आणि विशेषतः बीड जिल्ह्यातील बहुतांश ऊस तोडणी कामगारांचा मतदानाचा मूलभूत अधिकार असल्यामुळे ते मतदानाचे पवित्र कार्य असून वंचित राहण्याची शक्यता होती त्यामुळे मतदानाची तारीख असलेल्या २० ऑक्टोबर नंतर साखर कारखान्यांनी गळीत हंगाम सुरू करावा मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री सहकार मंत्री आणि आमदार पंकजाताई साहेब मुंडे यांना आपण याबाबत अवगत केले असून त्यांनी याबाबत सकारात्मक विचार केला असून याबाबत तात्काळ निर्णय घेतला जाणार आहे त्यामुळे साखर कारखाना व्यवस्थापन आणि ऊस तोडणी कामगार मुकादम वाहतूकदार यांनी ऊस तोडणी कामगारांना साखर कारखान्याकडे पाठवण्याची घाई करू नये असे विनम्र आवाहन आपण करत आहोत असे त्यांनी शेवटी म्हटले आहे



माझी राज्य मंत्री शिवाजी दादा पंडीत पाडवा निमित्त आशीर्वाद घेताना आर पी आय तालुका प्रमुख किशोर कांडेकर, आर पी आय युवा सर्कल प्रमुख सुमेध करडे

# चौसाळा येथे ह.टिपू सुलतान युवा मंच यांची बैठक संपन्न

बीड -तालुक्यातील चौसाळा येथे सार्वजनिक ह.टिपू सुलतान जयंती २०२४ निमित्ताने बैठक पार पडली इर्शाद भाई कुरेशी यांच्या नेतृत्वाखाली टिपू जयंती २०२४ च्या अध्यक्ष पदी - अन्सर भाई मुजावर तसेच उपअध्यक्ष पदी - अस्लम भाई शेख व सचिव पदी- शाहरुख कुरेशी सदस्य - जाकेर शेख, अन्वर कुरेशी, जाकीर सौदागर, सलीम शेख, बबलू कुरेशी, अफ्रोज तांबोळी, सय्यद सोहेल, शोएब मुजावर, मोईन मुजावर, अवेज बागवान, आलीम कुरेशी, अरबाज मुलाने, शाहरुख मुलाने, फिरोज मुलाने, रिजवान सौदागर, सलीम जहागीरदार, शहनाज शेख, मेंबर दादा, अतिक मुलाने, फैय्याज मनियार, नावेद सय्यद, नदीम बागवान, जावेद कुरेशी, इरफान मुलाने, फैसल कुरेशी, आदी यांची एक मताने निवड करण्यात आली.

टिपू सुलतान जयंती निमित्त चौसाळा शहरा मध्ये दि. २५/११/२०२४ रोजी मिरवूण ( जूलस ), रक्त दान शिबीर, हिजामा कॅम्प, तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT